रे.मु.नं. १६३८/२०१४ मधील नि.२८ वरील आदेश

प्रस्तूतचा अर्ज प्रतिवादी क्र.८ व १० यांनी त्यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यासाठी दाखल केला आहे.

२ प्रतिवादींच्या मते, दावा मिळकती संदर्भातील महत्वाची कागदपत्रे त्यांना न मिळाल्यामूळे कैफियत दाखल करण्यास उशीर झाला आहे. तो उशीर मुद्दाम केलेला नाही. त्यांचे पुढे असे कथन आहे कि, दावा मिळकती संदर्भात वादी व प्रतिवादी यांच्यात गंभीर तक्रारी आहेत. प्रतिवादींची कैफियत न स्विकारल्यास त्यांचे कधीही न भरून येणारे असे नुकसान होणार आहे. याउलट वादीचे काहीही नुकसान होत नाही. सबब कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्याची विनंती प्रतिवादींनी केली आहे.

३ वादीने प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करून त्याचा आक्षेप नोंदविला आहे. त्याच्या मते अर्जातील कारण योग्य व कायदेशीर नाही. प्रतिवादींना कैफियत दाखल करण्यास एक वर्षाचा विलंब झाला आहे. तो उशीर मुद्दामहून केलेला आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर व्हावा व मंजूर करावयाचा झाल्यास वादीला रक्कम रूपये ७०००/— इतका खर्च मिळावा अशी विनंती केली आहे.

४ प्रतिवादीचे वकील युक्तीवाद करण्यास असमर्थ ठरले. वादीच्या वकिलांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादींना कैफियत दाखल करण्यास अल्पसा विलंब झालेला आहे. तो नूकसान भरपाईच्या रूपाने भरून काढतायेण्याजोगा आहे. प्रस्तुत प्रकरण गुणदोषावर निकाली करण्यासाठी प्रतिवादींना त्यांची कैफियत मांडण्याची संधी देणे न्यायोचित वाटते. त्यामुळे न्यायाचा हेतु साध्य करण्यासाठी मी पुढील आदेश पारीत करत आहे.

## **आदेश**

१. प्रतिवादींचा अर्ज रक्कम रू. ३००/— इतक्या खर्चावर मंजूर करण्यात येतो.
२. प्रतिवादींनी वादीस पुढील तारखेपर्यत प्रस्तूत अर्जाचा खर्च देणे बंधनकारक राहील.

दि.१५.११.२०१७ ३ रे सह दिवाणी न्यायाधीश,क स्तर,बार्शी

<u>Certificate</u>

I affirm that, the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | R.H.Lasane. |
| Court | : | 3rd JtCJJD & JMFC, Barshi. |
| Date: | : | 15/11/2017 |
| Judgment/Order signed by the presiding officer | : : | 15/11/2017 |
| Judgment/Order uploaded on | : : | 16/11/2017 |